# सत्र काळातील कामकाजाचा आढावा

**अध्यक्ष :** आता मी सभागृहाच्या कामकाजाचा आढावा घेत आहे. विधानसभेचे सोमवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० पासून सुरु झालेले अर्थसंकल्पीय अधिवेशन आज शनिवार, दिनांक १४ मार्च, २०२० रोजी संस्थगित होत आहे.

या सभागृहाच्या बैठकांची एकूण संख्या १४ असून प्रत्यक्षात ९२ तास ९ मिनिटे कामकाज झालेले आहे. मंत्री उपस्थित नसल्यामुळे १० मिनिटे व अन्य कारणामुळे ४ तास १९ मिनिटे असा कामकाज होऊ न शकलेला एकूण कालावधी ४ तास २९ मिनिटे आहे. सभागृहाचे रोजचे सरासरी कामकाज ६ तास ५८ मिनिटे झालेले आहे.

एकूण प्राप्त झालेल्या तारांकित प्रश्नांची संख्या ८७४५ असून स्वीकृत झालेल्या तारांकित प्रश्नांची संख्या ७६० असून सभागृहात ६७ प्रश्नांची तोंडी उत्तरे देण्यात आली. एकूण प्राप्त झालेल्या अल्पसूचना प्रश्नांची संख्या ०६ असून स्वीकृत झालेल्या अल्पसूचना प्रश्नाची संख्या ०१ आहे.

एकूण प्राप्त झालेल्या लक्षवेधी सूचनांची संख्या २३३१ असून स्वीकृत लक्षवेधी सूचना १३५ इतक्या आहेत. तर चर्चा झालेल्या लक्षवेधी सूचना ११ आहेत.

या अधिवेशनात विधानसभेने एकूण १६ विधेयके संमत केली व दोन्ही सभागृहांनी एकूण १६ विधेयके संमत केली.

....2/-

अर्धा तास चर्चेच्या एकूण १९३ सूचना प्राप्त झाल्या त्यापैकी ८७ स्वीकृत करण्यात आल्या आणि सभागृहात एकाही अर्धा तास चर्चेच्या सूचनेवर चर्चा झाली नाही.

नियम २९३ अन्वये ३ प्रस्तावांवर चर्चा करण्यात आली.

संपूर्ण अधिवेशन कालावधीत सभागृहात माननीय सदस्यांची एकूण सरासरी उपस्थिती ८२.०१ टक्के होती. त्यात जास्तीत जास्त उपस्थिती ९१.९० टक्के तर कमीत कमी उपस्थिती ५१.४१ टक्के एवढी होती.

या अधिवेशनाचा समारोप करताना मी माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री, माननीय उपाध्यक्ष, माननीय संसदीय कार्यमंत्री, सर्व मंत्री महोदय, सर्व माननीय तालिका सभाध्यक्ष, माननीय विरोधी पक्ष नेते, माननीय गट नेते, सर्व सन्माननीय सदस्य, प्रसिध्दी माध्यमांचे प्रतिनिधी, विधिमंडळाचे अधिकारी व सर्व कर्मचारी, सर्व सुरक्षा अधिकारी व कर्मचारी या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो. मंत्रालयीन अधिकारी व कर्मचाऱ्यांचे देखील मी या ठिकाणी आवर्जून आभार मानतो.

आता मी पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा व हे अधिवेशन संस्थगित करण्याबाबत माननीय राज्यपालांकडून जो संदेश आलेला आहे तो वाचून दाखवितो.

-------